महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२९/२०२२ दि. ११/०४/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहर, वाहतुक उपविभाग विठ्ठलवाडी अंर्तगत दि. १४/०४/२०२२ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ जयंती निमित्त लहान मोठया मिरवणुका व ०१ मुख्य मिरवणुक काढण्यात येणार आहे. सदर मुख्य मिरवणुक ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी, उल्हासनगर ४ येथे समाप्त होणार असून मिरवणुकी दरम्यान मिरवणुक मार्गावर वाहतुक कोंडी न होता मिरवणुक सुरळीत पार पाडता यावी व परिसरातील वाहतुक सुरळित व सुनिश्चत व्हावी नागरीकाची गैरसोय होवू नये. याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए ११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे वाहतुक नियत्रंण अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद – व No Parking-** १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी येथुन मिरवणुक सुरू – नागसेन नगर – कुर्ला कॅम्प – समता नगर १– काली माता मंदिर चौक – भाटीया चौक – नेताजी चौक – व्हिनस चौक – लाल चक्की चौक – सार्वजनिक मित्र मंडळ – परत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी येथे समाप्ती होईपर्यंत **No Parking** व **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) उल्हासनगर स्टेशन कडुन आंबेडकर चौकाकडे येणारी वाहतुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातुन तक्षशिला विदयालय मार्गे गुरूनानक शाळेकडुन इच्छीत स्थळी जातील.

ब) अंबरनाथ व कैलाश कॉलनी कडुन येणारी वाहतुक कुर्ला कॅम्प समतानगर ओ. टी. सेक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

क) मठ मंदिर चौक व गांधी रोड तसेच हिललाईन पो. स्टे. कडुन येणारी वाहतुक ही नेताजी चौकातुन बंगलो ऐरीया मार्गे इच्छीत स्थळी जातील.

ड) व्हिनस चौकाकडुन उल्हासनगर स्टेशनकडे जाणारी वाहतुक २५ सेक्शन स्मशानभुमी मार्गे संभाजी चौक कडुन इच्छीत स्थळी जातील.

ई) उल्हास स्टेशन कडुन संभाजी चौकाकडे येणारी वाहतुक ही संभाजी चौकातुन भाटीया चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना ही दि. १४/०४/२०२२ रोजी दुपारी १४:०० वा. ते २४:०० वा पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर बिग्रेड, रूग्णवाहिका इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहीतीसाठी,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक, विभाग कल्याण.

Scanned with CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर/विशेष शाखा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग कल्याण
प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर

प्रत :–

मा.पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकाच्या माहितीसाठी ठाणे पोलीस वेबसाईडवर प्रसिद्ध करण्यास विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए.एस.कक्ष ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सहा. पोलीस आयुक्त, उल्हासनगर वाहतूक विभाग, ठाणे शहर.
पोलीस निरीक्षक, उल्हासनगर/विठ्ठलवाडी, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

Scanned with CamScanner